**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्रमांक १ याची जबानी सत्यप्रतिज्ञेवर सुरु.</u>**

मोटार अपघात नुकसान भरपाई
अर्ज क्र.१७०/२०२१
जुना M.A.C.P. क्र.६५/२०१९
मोहन –वि.– प्रद्युम्नभाई
<u>निशाणी क्र.२५ खाली</u>

**<u>पुढील सरतपास– अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. बी.के. टावरी यांचेमार्फत शपथेवर सुरु...</u>**

७. शपथपत्र माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीण्यात आलेले असुन त्यामधील मजकुर बरोबर आहे. त्यावर मी सही केली आहे. ए ए फॉर्मची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.२६</u>** वर आहे. एफ.आय.आर.ची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.२७</u>** वर आहे. घटनास्थळ पंचनाम्याची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.२८</u>** वर आहे. इनक्वेस्ट पंचनाम्याची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.२९</u>** वर आहे. शवविच्छेदन अहवालाची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.३०</u>** वर आहे. दोषी वाहन जी.जे.०३ एटी २७०७ चे मालवाहतुक परवान्याची सत्यप्रत **<u>निशाणी क्र.३२</u>** वर आहे. अपघातग्रस्त वाहन क्र. एम.एच.०१ एआर ४७०५ या कारचे नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत **<u>निशाणी क्र.३३</u>** वर आहे. सदर कारच्या इंशुरंसच्या शेड्युल्डची सत्यप्रत **<u>निशाणी क्र.३४</u>** वर आहे. (निशाणी क्र.३२ ते ३४ वरील मुळ सत्यप्रती याच अपघातामधुन दाखल झालेल्या आहे M.A.C.P. क्र.१६८/२०२१ मध्ये दाखल करण्यात आलेल्या आहेत.) दोषारोपपत्राची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.३५</u>** वर आहे. दोषी वाहन क्रमांक जी.जे.०३ एटी २७०७ च्या चालकाचा वाहन चालवण्याचा परवान्याची साक्षांकित प्रत **<u>निशाणी क्र.३६</u>** वर आहे. त्या वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत **<u>निशाणी क्र.३७</u>** वर आहे. त्या वाहनाची विमा पॉलीसीची साक्षांकित प्रत **<u>निशाणी क्र.३८</u>** वर आहे. (निशाणी क्र.३६ ते ३८ वरील मुळ सत्यप्रती याच अपघातामधुन दाखल झालेल्या आहे M.A.C.P. क्र.१६८/२०२१ मध्ये दाखल करण्यात आलेल्या आहेत.) माध्यमिक शालांत प्रमाणपत्राची मुळ प्रत **<u>निशाणी क्र.३९</u>** वर आहे.

सरतपास पुर्ण.

**गैरअर्जदार क्र.१ व २ तर्फे कोणीही हजर नसल्याने उलटतपास नाही...**

**उलटतपास– गैरअर्जदार क्र.३ तर्फे विधीज्ञ श्री. बी.बी.पांडे यांचेमार्फत सुरु...**

८. हे म्हणणे खरे आहे की, मी अपघात होतांना पाहीलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताची खबर मी पोलीस ठाण्यात दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा जबाब तपासादरम्यान घेतला नाही. पोलीस ठाण्यात अपघाताचा कोणी रिपोर्ट दिला ते मला माहित नाही. लालचंद लालवानी हे माझे नातेवाईक नाही. कारचा ज्यावेळी अपघात झाला त्यावेळी कारमध्ये चार सज्ञान आणि दोन अज्ञान मुले होती. त्या दोन मुलांचे वय अनुक्रमे १३ वर्ष आणि ११ वर्ष होती. रिपोर्ट ज्यांनी दिला त्यांनी ही घटना पाहीली हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताच्यावेळी कोणाची चुक होती हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, कारचा अपघाताच्यावेळी कॉम्प्रीहेंसिव विमा नव्हता. साक्षीदार स्वतः सांगतो की, थर्ड पार्टी विमा होता. हे म्हणणे खरे आहे की, अपघात घडल्यानंतर आम्हाला माहिती होते की कारमधील प्रवाशांचा विमा घेतलेला नाही.

९. हे मला माहिती नाही की त्यामुळे कारमधील मृत व्यक्तींना आणि जखमी व्यक्तींना विमा कारच्या पॉलीसीवर मिळणार नाही हे मला माहिती नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, कार चालकाच्या चुकीमुळे आणि निष्काळजीपणाने तो अपघात झाला आणि तो एकटाच या अपघाताला जबाबदार होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळेच ट्रक चालकाच्या विरुध्द पोलीस ठाण्यात रिपोर्ट दाखल करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, अपघात घडला त्यावेळी चालकाच्या बाजुला आणखीन दोन व्यक्ती बसलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, कारच्या परवान्यापेक्षा जास्त व्यक्ती कारमध्ये बसले होते.

१०. करिश्मा व्यतिरिक्त मला मोठी मुलगी आणि तिच्यापेक्षा एक लहान मुलगा आहे. करिश्माच्या शिक्षणावरील सर्व खर्च मी करत असे. हे म्हणणे खरे आहे की, करिश्मा ही पुर्णता माझ्यावर अवलंबुन होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या

शपथपत्राच्या परिच्छेद क्र.३ ते ५ हा जास्त नुकसान भरपाई मिळण्यासाठी खोटा दिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपघात झाला त्यावेळी करिश्मा कमवती नव्हती.

११. ट्रक चालकाकडे ट्रक चालविण्याचा परवाना नव्हता हे मी सांगु शकत नाही. ट्रकचे फिटनेस प्रमाणपत्र आणि परमीट नव्हता हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे विमा कंपनी नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नाही. हे म्हणणे खरे नाही की, जास्त नुकसान भरपाई मिळण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2022.02.23 17:19:51 +0530

दिनांक : २३/०२/२०२२

**(एस.व्ही.जाधव)**
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.

वाचुन दाखवले बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत नोंदविण्यात आला.)

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2022.02.23 17:19:56 +0530

दिनांक : २३/०२/२०२२

**(एस.व्ही.जाधव)**
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.